# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग
स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)
जि. ठाणे – ४०१ १०७. दूरध्वनी : ०२२-२८१२१४५५, * E-mail Id : tp@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

माहिती व तंत्रज्ञान विभाग (Legal) - २०२५

**जा.क्र :- मनपा/नर/** ६३३/२०२६-२७ **दिनांक :-** १८/०६/२०२६

**प्रति,**
**सिस्टीम मॅनेजर,**
**नागरी सुविधा केंद्र**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

विषय :- विकास योजना - मिरा भाईंदर
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 37(1) अन्वये प्रस्तावित फेरबदलाबाबतची सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- मा. महासभा प्रकरण क्र.08 ठराव क्र.11 दि.06/05/2026.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना यामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 37(1) अन्वये प्रस्तावित फेरबदल करणे करिता मा. महासभा प्रकरण क्र.08 ठराव क्र.11 दि.06/05/2026 अन्वये मंजुरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाची सुचना नागरिकांच्या सुचना / हरकतीसाठी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर नागरीकांच्या अवलोनार्थ प्रसिध्द करण्यात यावे, हि विनंती.

सोबत :- पेनड्राइव्ह मध्ये Soft Copy

**(पु. म. शिंदे)**
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
## ता. व जि. ठाणे

// **सूचना** //

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल)**

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर शहराची सुधारीत विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम 31(1) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-1296/847/प्र.क्र.162/96/नवि-12, दिनांक 14 मे, 1997 अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक 15 जुलै, 1997 पासून अंमलात आली होती. आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र.टिपीएस-1298/941/प्र.क्र.89/98/नवि-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झाली असुन, ती दि.15/10/2000 पासून अंमलात आली होती. (यापुढे ज्याचा एकत्रितपणे उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे);

उपरोक्त विकास योजना सुधारीत करण्याच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना ठाणे शाखा कार्यालय यांनी वैधानिक कार्यवाही करून उक्त अधिनियमाचे कलम - 30 अन्वये ती शासनास मंजुरीसाठी दि.25/10/2023 रोजी सादर केली असता सदरची सुधारीत प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम 31(1) अन्वये दि. 16/04/2026 रोजी सारभुत स्वरुपाचे बदल (EP) वगळुन शासन नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस-1225/452/प्र.क्र.60/25/एस.एम./नवि-12 दि.16/04/2026 अन्वये शासनामार्फत मंजूर करण्यात आली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त मंजूर विकास योजना" असा करण्यात आला आहे.)

ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मेट्रो लाईन क्र.09 वरील दहिसर ते काशिगांव या स्थानकापर्यंत मेट्रोचा शुभारंभ दि.07/04/2026 रोजी मा. मुख्यमंत्री महोदय तसेच मा. उप मुख्यमंत्री महोदय, यांचे शुभहस्ते करण्यात आली आहे.

सदर मेट्रो स्थानकास प्रवाशांच्या सोईसाठी बस कनेक्टीव्हीटी, दुचाकी पार्किंग व्यवस्था व रिक्षा स्टॅण्डचे नियोजन करणेसह सदर ठिकाणी “पार्किंग” ची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मा.उप-महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.08/04/2026 रोजी प्रशासनास पत्राद्वारे कळविले आहे.

ज्याअर्थी, मिरा भाईंदर शहराच्या उक्त मंजूर विकास योजनेत मौजे गोडदेव स.क्र.771/पै., (जुना), 81/पै., (नविन) या जागेचे एकुण क्षेत्र 5560.00 चौ.मी. असून जागेची मालकी लोकल बोर्ड खाण अशी असून सदर जागा शासकीय आहे. सदर जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार भागश: 45.00 मी. रुंद रस्त्याने (3131.00 चौ.मी.) बाधीत होत असून उर्वरित 1929.00 चौ.मी. क्षेत्र रहिवास विभागामध्ये अंतर्भुत आहे. सदरचे रस्त्याखालील क्षेत्र वगळता 1929.00 चौ.मी. क्षेत्र मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील दि.18/12/2023 च्या आदेशानुसार अप्पर तहसिलदार, मिरा भाईंदर यांचेकडील पत्र क्र.महसूल/क-1/टे-1/जमिनबाब/कावि-318/2025 दि.11/07/2025 अन्वये मिरा भाईंदर महानगर पालिकेकडे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याच्या जबाबदारी व अटीशर्तीस अधिन राहून मिरा

भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेले आहे. सदर हस्तांतरीत केलेल्या जागेमधून दोन ठिकाणी अंतर्गत रस्ते गौरव गार्डन या इमारतीमध्ये जाणेसाठी विकसीत केले असुन उर्वरित क्षेत्रावर बगीचा विकसीत झाला आहे.

त्याअर्थी, सदर शासकीय जागेपैकी अंतर्गत रस्ते वगळता काही क्षेत्रावर बगीचा विकसीत झाला असला तरी मेट्रोच्या प्रवासासाठी येणाऱ्या नागरीकांच्या वाहनांकरिता पार्कींग सुविधा देखील आवश्यक असल्याने भविष्यामध्ये "दिपक हॉस्पीटल" या स्टेशनच्या परिसरामध्ये पार्कींग व्यवस्था उपलब्ध केल्यास नागरीकांना सदर ठिकाणी वाहने पार्क करुन नियोजित स्थळी मेट्रोने पोहोचणे सुकर होणार असल्याची बाब विचारात घेऊन मौजे गोडदेव स.क्र.771/पै., (जुना), 81/पै., (नविन) या जमिनीचे महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्रावर उक्त मंजुर विकास योजना नकाशावर दर्शविल्यानुसार "वाहनतळ आरक्षण" प्रस्तावित करणेकामी मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र. 11, प्रकरण क्र. 08, दि.06/05/2026 अन्वये उक्त अधिनियमाचे कलम 37(1) नुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित करणेकामी ठराव पारीत केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रस्तावीत फेरबदल" असा करण्यात आला आहे.)

आणि त्याअर्थी, उपरोक्त नमुद "उक्त प्रस्तावीत फेरबदलाबाबत" ज्या नागरीकांना हरकती किंवा सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी हरकती / सूचना लेखी स्वरुपात सदरची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून 30 दिवसाच्या मुदतीपर्यंत सादर कराव्यात, म्हणजे सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी उक्त सूचना / हरकतींचा विचार करता येऊ शकेल.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी व माहितीसाठी, महानगरपालिका, मुख्य कार्यालयात व नगररचना विभागामध्ये कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

**(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

## BHAINDAR (W)

LATE INDIRA GANDHI BHAWAN, CHHATRAPTTI SHIVAJI MAHARAJ MARG,

BHAINDAR (W), TQ. & DIST. THANE 401 101

# NOTICE

## (UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT-1966)

Whereas, the Revised Development Plan of the city of Mira- Bhayander (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned by the Government's Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPS-1296/847/CR-162/96/UD-12, dated the 14th May, 1997 and has come into force with effect from 15th July, 1997 and the Excluded Part of the said Development plan has been sanctioned by the Government's Urban Development Department vide Notification No. TPS-1298/941/CR-89/98/UD-12, dated the 25th August, 2000 which came into foce with effect from the 15th October, 2000. The aforesaid Notifications are hereinafter referred to as "the said Notifications".

Whereas, the Appointed Officer and Assistant Director, Town Planning, Thane Branch Office, after undertaking the requisite statutory process for revision of the aforesaid Development Plan, Submitted the same to the government under Section 30 of the said act on 25 Oct 2023 and and the said revised draft Development Plan has been sanctioned excluding the modifications of a substantive nature (EP). by the Government's Urban Development Department vide Notification No. TPS-1225/452/CR60/25/SM/UD-12, dated the 26th April 2026 under Section ,31(1) of the said Act. (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan")

Whereas, Metro Line No. 09, extending from Dahisar to Kashigaon Station within the jurisdiction of the Mira-Bhayandar Municipal Corporation, was inaugurated on 07 April 2026 by the Hon'ble Chief Minister and the Hon'ble Deputy Chief Minister;

And Whereas, the Hon'ble Deputy Mayor, Mira-Bhayandar Municipal Corporation, vide letter dated 08/04/2026, has informed the Administration regarding the need to provide parking facilities at the aforesaid Metro Station and to undertake planning for bus connectivity, two-wheeler parking arrangements, and an auto-rickshaw stand for the convenience of commuters;

And Whereas, in the said sanctioned Development Plan of Mira-Bhayandar City, the land bearing Survey No. 771/Pt. (Old) and Survey No. 81/Pt. (New) of Village Goddev, admeasures a total area of 5,560.00 square metres, The ownership of the land is listed as "Local Board Quarry" and the said land belongs to the Government. As per the said sanctioned Development Plan of the Mira-Bhayandar Municipal Corporation, out of the aforesaid land, an area of 3,131.00 square metres is affected by a proposed 45.00-metre-wide road, while the remaining area of 1,929.00 square metres falls within the Residential Zone. Excluding the area affected by the proposed road, the remaining area admeasuring 1,929.00 square metres was transferred to the Mira-Bhayandar Municipal Corporation, subject to the responsibility of protecting the land from encroachment and on the terms and conditions stipulated therein, pursuant to the Order dated 18/12/2023 of the District Collector, Thane, and as communicated

by the Additional Tahsildar, Mira-Bhayandar vide Letter No. Mahasul/K-1/Te-1/Jaminbab/Kavi-318/2025 dated 11/07/2025. Within the said transferred land, internal access roads have been developed at two locations to provide access to the building known as "Gaurav Garden", and the remaining area has been developed as a garden;

Therefore, although a garden has been developed on a portion of the aforesaid Government land, excluding the internal access roads, parking facilities are also required for vehicles of commuters using the Metro services, provision of a parking facility in the vicinity of the "Deepak Hospital" Metro Station would facilitate citizens in parking their vehicles at the said location and thereafter travelling conveniently to their intended destinations by Metro, thereby promoting the use of public transport and improving commuter convenience. Considering the requirements for the provision of parking facility a reservation for "Parking Area" on the land under the possession of the Mira-Bhayandar Municipal Corporation forming part of Survey No. 771/Pt. (Old) and Survey No. 81/Pt. (New), Village Goddev, as delineated in the said Sanctioned Development Plan. The Mira-Bhayandar Municipal Corporation, vide General Body Resolution No. 11, Agenda Item No. 08, dated 06/05/2026, has resolved to propose a modification to the said Sanctioned Development Plan under Section 37(1) of the said Act. The aforesaid modification shall hereinafter be referred to as the "said proposed to Modification".

And accordingly, the citizens who have objections or suggestions regarding the above-mentioned "proposed modification" should submit their objections/suggestions in writing within 30 days from the date of publication of the said notice in the Government Gazette, so that the said suggestions/objections can be considered before finalizing the proposal for the said modification.

The plan showing the proposed modification is available for inspection by the public during office hours at the office of the Municipal Corporation and at the Town Planning Department, Swami Vivekanand Bhavan, Kanakia, Mira Road (East), Taluka and District Thane – 401107.

**(Radhabinod A. Sharma, I.A.S.)**
**Commissioner**
**Mira Bhayander Municipal Corporation**